. Babasaheb Ambedkar
Marathwada University,
Chh. Sambhajinagar-431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
P.G.Admission Unit

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छ. संभाजीनगर- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
पदव्युत्तर प्रवेश विभाग

# -: परिपत्रक :-

(सुधारित)

**संदर्भ क्र. १) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता CET परीक्षा आयोजित करुन प्रवेश देणे बाबत प्रवेश नियामक समितीने मा. कुलगुरु महादेयांच्या अध्याक्षतेखाली झालेल्या बैठकी मध्ये केलेली शिफारस दिनांक २८-०३-२०२४, दिनांक ०५-०४-२०२४, दिनांक २९-०४-२०२४, दिनांक १०-०५-२०२४.**

**२) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता CET परीक्षा आयोजित करणे संदर्भात विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस दिनांक २५-०४-२०२४, दिनांक ०६-०५-२०२४.**

**३) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश पात्रतेबाबतच्या सुधारित अध्यादेशास मा. कुलगुरु महादेयांनी दिलेली मान्यता दिनांक १०-०४-२०२४.**

**४) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रस्तुत परिपत्रकातील नियमकास तथा CET परिक्षेच्या वेळापत्रकास मा. कुलगुरु महादेयांनी दिलेली मान्यता दिनांक ०९-०५-२०२४**

**५) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेशाबाबत यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेले प्रस्तुत परिपत्रक दिनांक १०-०५-२०२४.**

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाव्दारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठा अंतर्गत विद्यापीठ मुख्य परिसर व उप-परिसर येथे सुरु असलेल्या सर्व पदव्युत्तर विभाग यांचे शैक्षणिक विभाग प्रमुख, संचालक उपकेंद्र धाराशिव, विद्यापीठाचे सर्व अधिकारी तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे पात्र विद्यार्थी यांना सुचित करण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विद्यापीठ सर्व शैक्षणिक विभाग निहाय विभागीय स्तरावर अभ्यासक्रम निहाय CET परीक्षा आयोजित करुन CET परीक्षेचे संपादीत गुण / ऑडिशन किंवा कला परीक्षा चाचणी व पदवी परीक्षेस विद्यार्थ्याने तृतीय किंवा अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयामध्ये प्राप्त केलेले गुणांच्या सरासरी नूसार गुणवत्तेप्रमाणे महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या आरक्षणानूसार आगामी शैक्षणिक वर्षापासून सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमास खालील प्रमाणे विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

१) विद्यापीठ मुख्य परिसर व उप-परिसर येथे सूरु असलेल्या सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विभाग निहाय विभागीय स्तरावर सर्व विभाग प्रमुखांनी ऑनलाईन प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या अर्जदार विद्यार्थ्यांची CET परीक्षा आयोजित करुन विद्यार्थ्याने CET परिक्षेमध्ये संपादीत केलेले एकुण गुण व पदवी परीक्षेच्या तृतीय किंवा अंतिम वर्षाच्या ऐच्छिक

विषयामध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या सरासरी नूसार शासनाने निर्धारित केलेल्या आरक्षणाप्रमाणे उदा. ५०% गुण CET परीक्षेचे व ५० % गुण अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयाचे ग्राह्य धरुन गुणवत्तेनूसार अभ्यासक्रमाच्या निर्धारित प्रवेश क्षमते प्रमाणे प्रवेशयादी घोषित करण्यात यावी.

२) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता संगित व नाट्यशास्त्र विभागाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्याने संपादीत केलेले पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाचे गुण व ऑडिशन / कला परीक्षा चाचणीमध्ये प्राप्त केलेल्या एकुण गुणाच्या सरासरी नूसार गुणवत्तेप्रमाणे निर्धारित केलेल्या आरक्षणानूसार पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे.

३) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या CET परिक्षेचे नोटिफिकेशन दिनांक १५ मे, २०२४ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनूसार सुप्रसिध्द दैनिक वर्तमानपत्रामध्ये विद्यापीठाचे कुलसचिव यांच्या स्वाक्षरीने पदव्युत्तर विभागाने प्रसिध्द करणे बाबत प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी. तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी दिनांक १५ मे ते २५ मे, २०२४ संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत ऑनलाईन प्रणालीव्दारे नोंदणी करणे आवश्यक असून सदरील परीक्षा ऑफलाईन परीक्षा पध्दतीव्दारे परीक्षा घेण्यात येईल याबाबत सदरील जाहिरातीमध्ये उल्लेख करणे आवश्यक आहे.

४) प्रस्तुत प्रकरणी ऑनलाईन प्रक्रियेव्दारे CET परीक्षेकरिता विहित शुल्कासह प्राप्त झालेल्या आवेदन पत्रांची छाननी / तपासणी करुन सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांची विभाग निहाय विभाग प्रमुखांनी खालील प्रमाणे विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या वेळापत्रकानूसार विद्याखाखेनिहाय / विषयनिहाय आपल्या स्तरावरुन ऑफलाईन CET परीक्षा आयोजित करण्यात यावी.

## * विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत येणारे अभ्यासक्रम *

| अनु क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षेचे ठिकाण | CET परीक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| a | M.Sc Physics | भौतिकशास्त्र विभाग | दि. ०३-०६-२०२४<br>सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| b | M.Sc Electronics | इलेक्ट्रॉनिक्स विभाग | दि. ०३-०६-२०२४<br>दुपारी ०२:३० ते ३:३० पर्यंत |
| c | (i) M.Sc Computer Science<br>(ii) M.Sc Information Technology<br>(iii) M.Sc Artificial Intelligence | संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभाग | दि. ०५-०६-२०२४<br>सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| d | M.Sc Statistics | संख्याशास्त्र विभाग | दि. ०५-०६-२०२४<br>दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| e | M.Sc Mathematics | गणित विभाग | दि. ०६-०६-२०२४<br>सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| f | M.Sc Chemistry | रसायनशास्त्र विभाग | दि. ०६-०६-२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| g | M. Voc Industrial Automation | दिनदयाल उपाध्याय कौशल केंद्र | दि. ०७-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| h | M. Voc Automobile Technology | दिनदयाल उपाध्याय कौशल केंद्र | दि. ०७-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| i | M.Sc Biochemistry | जैवरसायनशास्त्र विभाग | दि. ०८-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| j | M.Sc Environment Science | पर्यावरणशास्त्र विभाग | दि. ०८-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| k | M.Sc Nanotechnology | भौतिकशास्त्र विभाग / नॅनोटेक्नॉलॉजी | दि. १०-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| l | M.Sc Forensic Science | फॉरेन्सिक सायन्स विभाग | दि. १०-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| m | M.Sc Food Technology | रसायन तंत्रज्ञान विभाग | दि. ११-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| n | (i) M.Sc Rural Technology (ii) M.Sc Conservation of Biodiversity | गोपिनाथराव मुंढे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था | दि. ११-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| o | M.Sc Zoology | प्राणिशास्त्र विभाग | दि. १२-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| p | M.Sc Botany | वनस्पतीशास्त्र विभाग | दि. १२-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| q | M.Sc Biotechnology | जैवतंत्रज्ञान विभाग, उपकेंद्र धाराशिव | दि. १३-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| r | M.Sc Microbiology | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग उपकेंद्र धाराशिव | दि. १३-०६-२०२४ दुपारी ०२:३० ते ०३:३० पर्यंत |
| s | M.Voc Printing Technology | प्रिंटिंग टेक्नॉलॉजी विभाग | दि. १४-०६-२०२४ दुपारी १२:०० ते ०१:०० पर्यंत |

## * वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत येणारे अभ्यासक्रम *

| अनु क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षेचे ठिकाण | CET परीक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| a | (i) Master of Commerce (M.Com) | वाणिज्य विभाग | दि. ०६-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| | (ii) Master of Business Administration MBA (IB) | ---do--- | दि. ०६-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| b | Master of Tourism & Travel Management (MTTM) | पर्यटन प्रशासन विभाग | दि. ०७-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| c | Water & Land Management (MMS) | जल व भूमी व्यवस्थापन विभाग उपकेंद्र धाराशिव | दि. ११-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |

# * मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत येणारे अभ्यासक्रम *

| अनु क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षेचे ठिकाण | CET परीक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| a | एम. ए. मराठी | मराठी विभाग | दि. ०३-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| b | एम. ए. हिंदी | हिंदी विभाग | दि. ०३-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| c | एम. ए. इंग्रजी | इंग्रजी विभाग | दि. ०५-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| d | एम. ए. ऊर्दु | ऊर्दु विभाग | दि. ०५-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| e | एम. ए. संस्कृत | संस्कृत विभाग | दि. ०६-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| f | एम. ए. पाली अॅन्ड बुध्दीझम | पाली अॅन्ड बुध्दीझम विभाग | दि. ०६-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| g | एम. ए. अर्थशास्त्र | अर्थशास्त्र विभाग | दि. ०७-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| h | एम. ए. मानसशास्त्र | मानसशास्त्र विभाग | दि. ०६-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| i | एम. ए. समजाशास्त्र | समाजशास्त्र विभाग | दि. ०८-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| j | एम. ए. इतिहास | इतिहास विभाग | दि. ०८-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| k | एम. ए. भुगोल | भुगोल विभाग | दि. १०-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| l | एम. ए. राज्यशास्त्र | राज्यशास्त्र विभाग | दि. १०-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| m | एम. ए. लोकप्रशासन | लोकप्रशासन विभाग | दि. ११-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| n | एम. ए. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र | दि. ११-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| o | एम. ए. आर्कलॉजी | इतिहास विभाग | दि. १२-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| P* | एम. ए. लाईफ लॉंगा लर्निग एक्सटेंशन | लाईफ लॉंगा लर्निग एक्सटेंशन इमारत | दि. १२-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| q* | एम. ए. वुमेन स्टडीज् | ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र | दि. १३-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |
| r | एम. ए. मास्टर ऑफ लॉ | विधी विभाग | दि. १३-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |
| s* | एम. ए. मास्टर ऑफ रुरल स्टडीज् इन सोसिओ कल्चर अॅन्ड पॉलिटिकल अॅजपेक्ट (MSR) | गोपिनाथराव मुंढे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था | दि. १४-०६-२०२४ दुपारी ०१:०० ते ०२:०० पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| t* | एम. ए. मास्टर ऑफ रुरल स्टडीज् इन इकॉनॉमिक्स, बँकिंग ऑफ इंडस्ट्री | गोपिनाथराव मुंढे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था | दि. १४-०६-२०२४ दुपारी ०४:०० ते ०५:०० पर्यंत |

## * आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणारे अभ्यासक्रम *

| अनु क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | परीक्षेचे ठिकाण | CET परीक्षेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| a | एम. ए होम सायन्स | होम सायन्स विभाग | दि. ०५-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| b | एम. ए. संगित | संगित विभाग | दि. ०६-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| c | एम. लिब ग्रंथालय व माहितीशास्त्र | ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग | दि. ०७-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| d | एम.ए. नाट्यशास्त्र | नाट्यशास्त्र विभाग | दि. ०८-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| e | एम. एस्. डब्लु (समाज कार्य) | समाजकार्य महाविद्यालय, मुख्य परिसर | दि. १०-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| f | एम. एफ. ए (फाईन आर्ट) | ललित कला विभाग | दि. ११-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| g | एम. ए. लिबरल आर्ट | स्कुल ऑफ लिबरल आर्ट विभाग | दि. १२-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| i | एम. ए. योगा | शारिरीक शिक्षण व क्रिडा विभाग | दि. १३-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |
| j | एम. ए जनसंवाद व वृत्तपत्रविद्या | जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग | दि. १४-०६-२०२४ सकाळी ११:०० ते १२:०० पर्यंत |

**टिप: विद्यापीठ प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानूसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक हित लक्ष्यात घेवून सर्व विद्याशाखेअंतर्गत विद्यापीठ मुख्य परसिर व उप-परिसर, धाराशिव येथे शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे CET परिक्षेचे परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून सर्व विषयांची परीक्षा विद्यापीठ मुख्य परिसर तसेच उपकेंद्र धाराशिव येथे सर्व विभाग प्रमखांनी आयोजित करण्याची व्यवस्था करण्यात यावी.**

५) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता सर्व विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या निर्धारित पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षास शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी CET परीक्षेसाठी विहित शुल्कासह विहित मुदतीत ऑनलाईन प्रणाली व्दारे नोंदणी करण्यास पात्र राहतील.

**६) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता आयोजित करण्यात येणाऱ्या CET परीक्षेचा अभ्यासक्रम हा सदरील विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या दर्जाचे / पदवी अभ्यासक्रमाच्या स्तरावरील असेल, याची कृपया सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घेण्यात यावी.**

७) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता विद्यापीठ मुख्य परिसर व उप-परिसर, धाराशिव येथील सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे विहित शुल्कासह ऑनलाईन प्रक्रियेव्दारे CET परीक्षेसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे तसेच पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने प्रत्यक्ष प्रवेशाबाबत विद्यापीठाच्या वेबसाईट वर प्रसिध्द केलेल्या नोटिफिकेशन नूसार पून्हा विहित शुल्कासह विहित केलेल्या प्रक्रियेने विषय निहाय / अभ्यासक्रम निहाय नोदंणी करणे आवश्यक राहील.

८) प्रस्तुत प्रकरणी माहिती पुस्तिकेत नमूद करण्यात आल्यानूसार शासन निर्णय दिनांक २७-०२-२०२४ व शासन निर्णय दिनांक ०६-०३-२०२४ अन्वये विहित केल्यानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय मागास प्रवर्गासाठी आरक्षण लागू राहील.

९) विद्यापीठ प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानूसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता माहितीपुस्तिका / ब्राऊचर इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेले असून मराठी आवृत्तीच्या माहितीपुस्तिकेमध्ये काही संदिग्धता असल्यास इंग्रजी आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीपुस्तिकेतील मजकूर व इतर माहिती अंतिम समजण्यात यावी.

१०) विद्यापीठ प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानूसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता इतर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने विभाग निहाय विभागीय स्तरावर आयोजित केलेली CET परीक्षा देणे आवश्यक असून सदरील CET परीक्षेच्या प्रत्येक प्रश्नास दोन गुण या प्रमाणे एकूण १०० गुणाची व ५० प्रश्नांची वस्तुनिष्ट / चार बहूपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका असेल सदरील परीक्षेचा कालावधी निर्धारित केलेल्या वेळापत्रकानूसार विषय निहाय स्वतत्रपणे १ तास कालावधीचा असेल. सर्व संबंधित विद्यार्थ्यांना विद्यापीठाने पुरविलेल्या ओ. एम. आर सीटव्दारे उत्तरपत्रिका संभाव्य पर्यायापैकी एका पर्यायावर काळया बॉलपेनशाईने डार्क / छायांकित करुन उत्तरपत्रिका ऑफलाईन पध्दतीव्दारे सोडविणे आवश्यक राहील. सदरील प्रश्नपत्रिका सोडवितांना विद्यार्थ्यांना कोणत्याच प्रकारचे संशयास्पद साहित्य / दस्तऐवज / मोबाईल किंवा इतर तत्सम इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे वापरण्यास परवानगी राहणार नाही, याची कृपया सर्व संबधितांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी अन्यथा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमानूसार संबंधित विद्यार्थी कार्यवाहीस पात्र राहील.

११) प्रस्तुत प्रकरणी CET परीक्षेसाठी विहित केलेल्या शुल्कासह विहित केलेल्या प्रक्रियेने नोंदणी केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना विभाग प्रमुखांनी विभागीय स्तरावर **युनिक विभागामार्फत** ऑनलाईन प्रक्रियेव्दारे आसन क्रमांक, विषयाचा उल्लेख तसेच इतर तत्सम बाबींचा उल्लेख करुन प्रवेश पत्र / हॉल टिकिट पुरवण्याची व्यवस्था आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

१२) प्रस्तुत प्रकरणी CET परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या एकुण संख्या जेवढी असेल त्याप्रमाणातच विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका सोडविण्यासाठी ओ.

एम. आर सीट तयार करण्यासाठी सर्व विभागाच्या विभाग प्रमुखांनी आवश्यक लागणाऱ्या ओ.एम. आर सीट च्या संख्येनूसार परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक यांच्याकडून सदरील उत्तरपत्रिकेची मागणी करुन घेण्यात यावी तसेच सदरील उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन परीक्षा विभागमार्फत विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार करणे आवश्यक आहे.

१३) प्रस्तुत प्रकरणी सर्व विषयांचे CET परीक्षेचे निकाल दिनांक १५ जुन, २०२४ पर्यंत घोषित करण्यात यावे.

१४) प्रस्तुत प्रकरणी CET / प्रवेश पात्रता चाचणी दिलेल्या विद्यार्थ्यांने या विद्यापीठाची किंवा इतर कोणत्याही समकक्ष मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय विद्यापीठाच्या https://bamuadm.samarth.edu.in या संकेत स्थळावर दिनांक १६ जुन ते २६ जुन, २०२४ पर्यंत प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून अर्जदार विद्यार्थ्याने पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयामध्ये संपादन केलेले गुण विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील निर्धारित करण्यात आलेल्या फॉरमॅट / प्रारुपामध्ये भरणे अनिवार्य आहे तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी शैक्षणिक दस्तऐवजासह सदरील नोंदणी पुर्ण झाल्यानंतर प्रवेश आवेदन पत्राची एक कॉपी डाऊनलोड करुन संबंधित विभागाकडे पुरक दस्तऐवजासह हार्ड कॉपी जमा करण्यात यावी.

१५) प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधित विभागाने प्राप्त प्रवेश आवेदन पत्रांची छानणी तपासणी करुन नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने दिनांक २९-०६-२०२४ रोजी पहिली प्रवेश यादी विद्यापीठाच्या वेबसाईट वर तसेच विभागाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

१६) प्रस्तुत प्रकरणी दिनांक २९-०६-२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रवेश यादीप्रमाणे दिनांक ०१-०७-२०२४ ते ०३-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्तऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

१७) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक ०५-०७-२०२४ रोजी विहित केलेल्या नियमानुसा विहित केलेल्या प्रक्रियेने दुसरी यादी जाहीर करण्यात यावी.

१८) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०५-०७-२०२४ रोजी घोषित केलेल्या दुसऱ्या यादी नुसार दिनांक ०६-०७-२०२४ ते ०८-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्तऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

१९) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक १०-०७-२०२४ रोजी विहित केलेल्या नियमानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने तीसरी यादी जाहीर करण्यात यावी.

२०) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १०-०७-२०२४ रोजी घोषित केलेल्या तीसऱ्या यादी नुसार दिनांक १०-०७-२०२४ ते १२-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्तऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

२१) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक १३-०७-२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत स्पॉट ॲडमिशनव्दारे विद्यापीठाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांना विहित शुल्काचा भरणा व मुळ दस्तऐवज तपासणी केल्यानंतर प्रवेश देण्यात यावेत.

२२) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेषित झालेल्या विद्यार्थ्यांचे नियमित वर्ग निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक १५-०७-२०२४ पासून सुरू करण्यात यावेत.

२३) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास किंवा निर्माण झाल्यास उक्त प्रकरणी प्रवेश नियामक समितीचे अध्यक्ष तथा वरिष्ट प्राध्यापक डॉ. सुरेश गायकवाडा (मो. नं. ९४२३४७३६६०) व संबंधित विभागांचे विभाग प्रमुख तसेच पदव्युत्तर विभागाचे प्रशाकिय कार्यालय (०२४०-२४०३१२३) यांच्याशी संपर्क करुन प्रवेशाबाबत येणारी अडचण दुर करुन घेण्यात यावी.

२४) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी CET परीक्षेबाबत तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमास नोंदणी करणेसंदर्भात विद्यापीठाच्या https://bamuadm.samarth.edu.in या संकेत स्थळावर वेळोवेळी व नियमितपणे भेट देण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यापीठाने विद्यापीठाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी दिलेल्या माहितीचे सर्व संबंधितांनी अवलोकन करुन अनुपालन करणे आवश्यक आहे तसेच उक्त प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उद्‌भविल्यास मा. न्यायालयाचा निर्णय अंतिम समजुन सर्व संबंधितावर मा. न्यायालयाचा निर्णय बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

उपकुलसचिव
पदव्युत्तर विभाग

**संदर्भ क्र. परिपत्रक / पदव्युत्तर विभाग / प्रवेशाबाबत / २०२४-२०२५ / ~~4674~~ 4734**
**दिनांक १४-०५-२०२४**

॥ ॥ ॥ ॥

प्रतिलिपी :

१) मा. कुलगुरु महोदय यांचे स्वियसहाय्यक, कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

२) मा. प्र कुलगुरु महोदय यांचे स्वियसहाय्यक, कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. कुलसचिव यांचे स्वियसहाय्यक, कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) मा. संचालक, उपकेंद्र धाराशिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
७) मा. विभाग प्रमुख, सर्व विभाग, विद्यापीठ मुख्य परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
८) मा. विभाग प्रमुख, सर्व विभाग, विद्यापीठ उप-परिसर धाराशिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
९) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
१०) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.